REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 10 | JULY - 2022

# नवीन शैक्षणिक धोरण 2020 संधी आणि अव्हाने

डॉ. बाळासाहेब निर्मळ
देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद.




शिक्षण ही एक अशी प्रक्रिया आहे ज्याद्वारे व्यक्तीचे शरीर, मन आणि चारित्र्य बनते आणि मजबूत होते. डोके, हृदय आणि मन एकत्र आणत एखाद्या व्यक्तीला त्याच्या किंवा तिच्यातील सर्वोत्तम ओळखणारे अष्टपैलू व्यक्तिमत्व विकसित करण्यास सक्षम करते. स्वातंत्र्यानंतर गेल्या सहा दशकांमध्ये भारतात उच्च शिक्षणाचा झपाट्याने विस्तार झाला आहे, तरीही ते सर्वांसाठी समान प्रमाणात उपलब्ध नाही. वार्षिक विकास दर ९% च्या वर जात असताना भारत आज जगातील सर्वात वेगाने विकसनशील देशांपैकी एक आहे. अजूनही लोकसंख्येचा मोठा वर्ग निरक्षर आहे आणि मोठ्या संख्येने मुलांना प्राथमिक शिक्षणही मिळत नाही. यामुळे लोकसंख्येच्या एका मोठ्या वर्गाला देशाच्या विकासात पूर्णपणे हातभार लावण्यापासून तर दूरच ठेवले गेले आहे, राज्यांचे आर्थिक यश थेट त्यांच्या शिक्षण व्यवस्थेवर अवलंबून असते. शिक्षण हे राष्ट्राचे सामर्थ्य आहे. विकसित राष्ट्र हे अपरिहार्यपणे शिक्षित राष्ट्र असते.

2020 जुलै महिन्यामध्ये भारताने २१व्या शतकातील पहिले व सर्वात व्यापक शैक्षणिक धोरण जाहीर केले. देशातील ३३ कोटी विद्यार्थ्यांसाठी आखलेले हे धोरण आपल्या देशाला विकसित देशांच्या बरोबरीने आणण्यासाठी फार महत्वाचे आहे. डॉ. के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील समितीने आखलेल्या या धोरणाच्या निर्मिती प्रक्रियेमध्ये विविध घटकांचा समावेश करण्यात आला. त्यात शिक्षक, विद्यार्थी, पालक, शिक्षणक्षेत्रातील तज्ज्ञ यांच्याशी सर्वंकष चर्चेअंती धोरण अंतिम करण्यात आले. १९६८ आणि त्यानंतर १९८६च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी ३५ वर्षानंतर आजही पूर्णपणे होऊ शकलेली नाही. गुणवत्तापूर्ण, सर्वांसाठी समान व व्यावसायिक कौशल्याधारित शिक्षण तसेच राष्ट्रीय विकासासाठी सक्षम व चारित्र्यसंपन्न पिढी निर्माण करणारी शिक्षणाची उद्दिष्टे ही आजवर साध्य होऊ शकलेली नाहीत. आता या नवीन धोरणानुसार प्रचलित शिक्षण व्यवस्थेत बदल करून ही उद्दिष्टे साध्य करणे अपेक्षित आहे.१९८६ नंतर पहिल्यांदाच असे शैक्षणिक धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणामध्ये भारताच्या शिक्षण व्यवस्थेला भेडसावणार्यास विविध आव्हानांवर उपाय सुचवण्याचा प्रयत्न करण्यात आला. हे नवे शैक्षणिक धोरण जाहीर झाल्याच्या वर्षापूर्तीनिमित्त बोलताना पंतप्रधान मोदी असे म्हणाले की आपण स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षामध्ये पदार्पण करत आहोत, एका प्रकारे नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे हा आता अत्यंत महत्वाचा

भाग बनला आहे, नवीन भारत आणि भविष्यासाठी तयार युवा पिढी घडवण्याच्या दृष्टीने हे धोरण महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. २१ शतकातील सर्वात दूरदर्शी धोरण आहे असे मत शिक्षणमंत्री धरमेन्द्र प्रधान यांनी मांडले आहे. याद्वारे प्रत्येक विद्यार्थ्याच्या क्षमतांचा योग्य वापर, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, क्षमता विकास आणि शिक्षणाच्या माध्यमांमध्ये परिवर्तन घडून येणार आहे. या धोरणामुळे शिक्षण सर्वसमावेशक, किफायतशीर, परवडण्याजोगे आणि न्याय्य होण्यास मदत होईल यावरही प्रधान यांनी भर दिला आहे. आत्तापर्यंत या क्षेत्रात कशी प्रगती झाली आहे ? हे धोरण खरेच प्रगतीपथावर आहे का ? येत्या काही दशकांमध्ये या धोरणासमोरील आव्हाने कोणती असणार आहेत ? याचा मागोवा या लेखात घेतला जाणार आहे

हे धोरण जाहीर झाल्यापासून गेल्या १६ महिन्यांमध्ये कोरोना महामारीचा सामना करत या धोरणामधील काही महत्त्वाचे टप्पे पूर्ण करण्यात आले आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे नव्या शैक्षणिक धोरणातील ध्येये आणि दृष्टीकोन याबाबत विविध भागधारकांमध्ये जागरूकता आणि हितसंबंध निर्माण करण्याच्या दृष्टीने सरकारने चांगली कामगिरी बजावली आहे. पंतप्रधान आणि इतर प्रमुख अधिकार्यांरची उपस्थिती असलेल्या दहा दिवसीय शिक्षक पर्वातून ही बाब प्रकर्षाने दिसून आली. याही पुढे जाऊन सरकारने मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे नाव बदलून शिक्षण मंत्रालय असे केले आहे. ऊर्जा मंत्रालयात मोठे परिवर्तन घडून आणणार्यात धर्मेंद्र प्रधान यांना शिक्षण मंत्रालयात आणल्यामुळे या मंत्रालयाला एक वेगळीच ऊर्जा प्राप्त झाली आहे. आपल्या कारकीर्दीमध्ये प्रधान यांनी वेळोवेळी उत्तम निर्णय व अंमलबजावणीची क्षमता आणि मुत्सद्दीपणा यांचे दर्शन घडवले आहे. त्यांच्या या कौशल्याचा वापर करून मोठे उपक्रम मार्गस्थ करण्यात फार मोठी मदत होणार आहे. पण विरोधी पक्षांचे सरकार असलेल्या राज्यांतून याला विरोध होण्याचीही भीती आहे.

या उपक्रमाद्वारे उच्च शिक्षणातील अनेक पर्याय विद्यार्थ्यांसाठी खुले होऊ शकतील. याशिवाय इयत्ता ३ री पर्यंत विद्यार्थ्यांचे वाचन, लेखन आणि संख्याशास्त्र शिकण्याची क्षमता सुधारण्यासाठी 'निपुण भारत मिशन', पहिलीला प्रवेश घेणार्यान विद्यार्थ्यांच्या तयारीसाठी तीन महिन्यांचा अभ्यासक्रम 'विद्या प्रवेश', शिक्षण अध्यायनासाठीचे 'दीक्षा' हे अॅप आणि माध्यमिक स्तरावरील शिक्षकांसाठी 'निष्ठा' हा शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम असे अनेक उपक्रम सरकारकडून आणण्यात आले आहेत.

या उपक्रमांची अंमलबजावणी सत्ताधारी पक्षांची ज्या राज्यांत सत्ता आहे अशा मूठभर राज्यांतच करण्यात आली आहे. २४ ऑगस्टला नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणारे कर्नाटक हे पहिले राज्य ठरले आहे. अलीकडेच नव्या शैक्षणिक धोरणातील काही उपक्रमांची अंमलबजावणी मध्यप्रदेश आणि हिमाचल प्रदेश या राज्यांनी करून या मेगा पॉलिसीच्या अंमलबजावणीला हातभार लावलेला आहे. आता खर्यार अर्थाने नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीने जोर धरला आहे असे म्हणता येईल. सध्या नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीने जरी जोर धरलेला असला तरीही ते पूर्णत्वाला जाण्याच्या मार्गावर अनंत आव्हाने आहेत. भारताच्या शैक्षणिक क्षेत्रातील विविधता आणि आकार लक्षात घेता या धोरणाची अंमलबजावणी हे एक अवघड काम असणार आहे. उदाहरणासाठी आपण शालेय शिक्षण व्यवस्थेचा विचार करू. १५ लाखाहून अधिक शाळा, २५ करोड विद्यार्थी आणि ८९ लाख शिक्षकांसह भारतातील शिक्षण व्यवस्था ही जगातील दुसर्या क्रमांकावरील शिक्षण व्यवस्था आहे.

उच्च शिक्षण व्यवस्थेचा आकारही फार मोठा आहे. एआयएसएचई २०१९ च्या अहवालानुसार, भारताच्या उच्च शिक्षण क्षेत्रात जवळपास १००० विद्यापीठे, ३९,९३१ महाविद्यालये आणि १०,७२५ स्वायत्त संस्थांमध्ये मिळून ३.७४ करोड विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. राज्य, जिल्हा तसेच तालुका स्तरावरील सर्व भागधारकांना एकत्र

आणून या नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे ही एक अत्यंत कठीण बाब ठरणार आहे. विलक्षण विविधता असलेल्या राज्यांमधील तसेच जिल्हास्तरावरील विविध भागधारकांमध्ये सामायिक जबाबदारी व मालकीची भावना निर्माण करणे हे शिक्षण मंत्रालयासाठी मोठे आव्हान असणार आहे.

नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी देशांच्या, राज्यांच्या आणि सरकारांच्या क्षमतेवर अवलंबून आहे. भारताच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये निधीची कमतरता आहे, संपूर्ण व्यवस्था ही नोकरशाहीवर आधारलेली आहे व नवीन कल्पना आणि वाढीच्या क्षमतेस शिक्षण व्यवस्थेत प्रतिकूल वातावरण आहे असे के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील मसुदा समितीने निदर्शनास आणून दिले आहे. नव्या शैक्षणिक धोरणामध्ये कल्पना केलेल्या परिवर्तनांच्या विशालतेला चालना देण्यासाठी शिक्षण मंत्रालये (केंद्र आणि राज्ये) आणि इतर नियामक संस्थांमधील अंतर्गत क्षमता अत्यंत अपुरी आहेत. उदाहरणार्थ, पारंपरिक शिक्षणाकडून प्रयोगात्मक शिक्षण व टिकात्मक विचारापर्यंत जाण्यासाठी ही शिक्षण व्यवस्था चालवणार्यान लोकांच्या व सोबतच शिक्षक, विद्यार्थी व पालकांच्या दृष्टिकोनात बदल होणे गरजेचे आहे.याचा अर्थ असा की या मेगा उपक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी हजारो शाळा व महाविद्यालयांच्या क्षमता वाढीस व पुनर्निर्देशनास हातभार लावणे आवश्यक आहे. थोडक्यात, मंत्रालयाची विद्यमान संघटनात्मक रचना आणि प्रणालीमध्ये मोठ्या प्रमाणात फेरबदल करावे लागणार आहेत.

नव्या शैक्षणिक धोरणाच्या दस्तऐवजामध्ये विद्यमान नियामक व्यवस्थेत सर्वसमावेशक व आमुलाग्र बदल घडवून आणण्याचा मार्ग आखण्यात आला आहे ही एक आशादायक बाब आहे. शिक्षण मंत्रालय सध्या भारत उच्च शिक्षण आयोगाच्या स्थापनेसाठी एक कायदा आणण्याच्या प्रयत्नात आहे. यूजीसी, एआयसीटीई आणि राष्ट्रीय शिक्षक प्रशिक्षण परिषदेच्या जागी भारत उच्च शिक्षण आयोग स्थापन करण्याचा विचारात सरकार आहे.

तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे धोरण मुख्यत्वे केंद्र आणि राज्यांमधील सहकार्यावर अवलंबून असणार आहे. या धोरणाचा मसुदा केंद्र सरकारने राज्य सरकारांसह विविध भागधारकांच्या योगदानातून तयार केला असला तरी त्याची अंमलबजावणी मुख्यत्वे राज्यांच्या सक्रिय सहकार्यावर अवलंबून आहे. याचे मुख्य कारण म्हणजे बहुतांश सेवांवर आधारित शैक्षणिक उपक्रम राज्य सरकारांकडून चालवले जातात. तामिळनाडू राज्याने नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी न करण्याची भूमिका अनुसरली आहे. अशीच भूमिका जर इतर राज्यांनीही घेतली तर केंद्राच्या चिंतेत वाढ होऊ शकते. त्यामुळे केंद्राकडून संघराज्याची समीकरणे कशाप्रकारे हाताळण्यात येत आहेत यावर नव्या शैक्षणिक धोरणाचे भवितव्य ठरणार आहे.

या धोरणाच्या दृष्टीने खाजगी क्षेत्राची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. भारतातील जवळपास ७० टक्के उच्च शिक्षण देणार्याू संस्था या खाजगी आहेत. तसेच एकूण संख्येच्या जवळपास ६० ते ७० टक्के विद्यार्थी खाजगी संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेत आहेत. खाजगी क्षेत्र आर्थिक संसाधने व नावीन्यपूर्ण कल्पना प्रदान करतात याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. या धोरणाच्या प्रक्रियेसाठी खाजगी क्षेत्राचे योगदान मिळवणे व यातील एक महत्त्वाचा भागीदार म्हणून खाजगी क्षेत्राच्या योगदानाला मान्यता देणे ही एक महत्त्वाची बाब आहे.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे विविध उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी येत्या दशकात पुरेल अशा संसाधनांची गरज लागणार आहे. या संदर्भात, या धोरणात म्हटल्याप्रमाणे नव्या धोरणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी देशाला शिक्षणावरील सार्वजनिक खर्च एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या ६ टक्क्यांपर्यंत वाढवावा

लागेल. भूतकाळात देण्यात आलेली आश्वासने आणि त्यांची प्रत्यक्ष पूर्तता यांचा विचार केल्यास हे नक्कीच कठीण काम असणार आहे. उदाहरणार्थ, १९६८च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षणावरील सार्वजनिक खर्च एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या ६ टक्क्यांपर्यंत नेण्याची शिफारस करण्यात आली होती. मात्र, गेल्या चार दशकांमध्ये शिक्षणावरील सार्वजनिक खर्च ३ टक्क्यांच्या पुढे गेलेला नाही. आश्चर्यकारक बाब म्हणजे ज्या वर्षी हे नवे शैक्षणिक धोरण आले त्यावर्षी शिक्षणावरील खर्च हा सर्वात कमी होता. २०२०-२१मध्ये शिक्षणावरील खर्च ९९,३११ कोटींवरून २०२१-२२ मध्ये ९३,२२४ कोटी इतका कमी झाला.

कोरोना आणि आर्थिक संकटामुळे सरकारने आरोग्य क्षेत्रात अधिक खर्च करणे पसंत केले, त्यामुळे शिक्षण क्षेत्रावरील खर्चात कपात झाली याबाबत कोणतेही दुमत नाही. पण येत्या काळात शिक्षणावरील खर्च कसा वाढवता येईल यासाठी कोणतीही योजना सरकारकडे नाही.

नवे शैक्षणिक धोरण २०२० हा नक्कीच एक मार्गदर्शक दस्तऐवज आहे. नव्या युगातील नवी आव्हाने लक्षात घेता विविध शैक्षणिक गरजा, संरचनात्मक असमानता आणि विद्यार्थ्यांना भविष्यासाठी तयार करण्यामध्ये येणार्याज समस्यांचे निराकरण हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे. यासोबतच शिक्षण व्यवस्थेतील अनेक संकटांना तोंड देण्याचे सर्वात आव्हानात्मक कार्यही या धोरणाद्वारे पूर्ण करायचे आहे.

प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतच दिले पाहिजे, अशी नवीन शैक्षणिक धोरणात स्पष्ट दिशा दिली आहे. आज संपूर्ण देशभरात फार मोठ्या संख्येने इंग्लिश माध्यमाच्या पूर्वप्राथमिक व प्राथमिक शाळा अस्तित्वात आहेत. निश्चितच इंग्लिश ही या सर्व मुलांची मातृभाषा नाही. त्यामुळे या शाळांचे भवितव्य काय असेल? आज मराठी शाळेत शिकणाऱ्या एखाद्या मुलाची मातृभाषा कन्नड, गुजराती, तामिळ असेल, तर त्याच्या शिक्षणाची पर्यायी व्यवस्था काय करता येईल? याचे स्पष्ट निर्देश नवीन शैक्षणिक धोरणात नाहीत.

भारताच्या अफाट लोकसंख्येला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि त्याद्वारे असंख्य रोजगाराच्या संधी निर्माण करणे हे या धोरणाच्या अंमलबजावणीवर ठरणार आहे. कोविड महामारीच्या काळात जलद पावले उचलून अवघड निर्णय घेऊन ते पूर्तीस नेण्याचे कौशल्य केंद्राने दाखवले आहे. याच कौशल्याचा फायदा शिक्षण क्षेत्रातही होणार आहे. नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी काही राज्यांनी केली आहे तर काही राज्ये त्या प्रक्रियेतून जात आहेत. तरीही अजून लांबचा पल्ला गाठायचा बाकी आहे. राज्य, जिल्हा, तालुका पातळीवरील विविध भागधारकांना तसेच खाजगी क्षेत्राला या धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये सहभागी करून घेणे हे एक अवघड काम आहे. सोबतच क्षमता, आर्थिक संसाधने तसेच नवीन कल्पना निर्मितीसाठीच्या अनुकूल वातावरणाची कमतरता ही आव्हानेही समोर आहेत. परंतु या सर्वांमध्ये विविध राज्यांमध्ये जनमत तयार करणे हे सर्वात कठीण काम आहे. थोडक्यात सांगायचे तर नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचे यश सहकारी संघराज्य प्रणाली व सुधारणांमध्ये योगदान देण्याची राज्यांची क्षमता यांवर अवलंबून आहे.

शिक्षक प्रशिक्षणाची महाविद्यालये हे असेच एक मोठे आव्हान आहे. सामान्यतः अभिमत महाविद्यालयाने (ऑटोनॉमस कॉलेजेसनी) हा विषय घ्यावा अशी शासनाची अपेक्षा आहे. ज्या महाविद्यालयात अधिकाधिक विषय शिकविले जातात - म्हणजे जिथे हे शैक्षणिक विविधता आहे, तिथे हे महाविद्यालय जोडले जाऊ शकते. याचे कारण चार वर्षांच्या शिक्षक अभ्यासक्रमात विविध विषयांची प्राथमिक माहिती दिली जाईल, कौशल्य दिली जातील. त्याबरोबर एक विषय विशेष अभ्यासाचा म्हणून निवडावा लागेल. ज्युनिअर कॉलेजमध्ये अथवा महाविद्यालयात वेगवेगळे विषय शिकविले जाणे अपेक्षित आहे. त्या सर्व विषयांचे तज्ज्ञ शिक्षक या शिक्षक महाविद्यालयात तयार करावे लागतील. पूर्वी डी.एड. झालेला शिक्षक प्राथमिक शाळेत

कुठलाही विषय शिकवत असे किंवा बी.एड. झालेला शिक्षक आपल्या एक किंवा दोन विषयांमध्ये नैपुण्य प्राप्त करून माध्यमिक शाळेत शिकवत असे. आता उच्च माध्यमिक व उच्च महाविद्यालयात विषयांची व्याप्ती पुष्कळ अधिक होणार आहे. शिक्षक महाविद्यालयांना पूर्वीच्या सहा-सात विषयांऐवजी आता तीस-चाळीस विषयांचे तज्ज्ञ शिक्षक तयार करावे लागतील. हे मोठे आव्हान असणार आहे. ग्रामीण व शहरी भागात कोठे कोणत्या विषयांचे शिक्षण दिले जाणार आहे, नेमके किती शिक्षक अपेक्षित आहेत हे निश्चित करून त्यानुसार त्या त्या विषयाच्या शिक्षकांची शाळा-महाविद्यालयात भरती करावी लागेल. त्या प्रमाणात शिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी विद्यार्थिसंख्या निश्चित करावी लागेल. हे आव्हान पेरण्याची जबाबदारी तुलनेने अधिक सक्षम असलेल्या संस्थांना व महाविद्यालयांना उचलावी लागेल.

उच्च शिक्षणामध्ये संशोधन विषयास अधिक महत्त्व दिले जाणार आहे. संशोधन विषयासाठी आवश्यक असलेल्या सुविधा सर्व महाविद्यालयांत उपलब्ध होणार नाहीत. उदाहरणार्थ, रसायनशास्त्र विषयात संशोधन करायचे असेल तर जी.सी., एच.पी.एल.सी., एफ.टी.आय.आर., एन.एम.आर., यू.व्ही. व्हिजिबल स्पेक्ट्रोफोटोमीटर यासारखी उपकरणे उपलब्ध करून द्यावी लागतील. ही उपलब्ध करून देण्याची क्षमता मोजक्या संस्थांकडे असू शकते. केंद्रस्थानी असलेल्या महाविद्यालयांना अशी उपकरणे विकत घेण्यासाठी, आवश्यक ती जर्नल्स उपलब्ध करून देण्यासाठी राज्य अथवा केंद्र सरकारने विशेष ग्रंथालये उपलब्ध करून दिली पाहिजेत. केंद्रस्थानी असलेल्या या संशोधन केंद्राचा उपयोग संकुलातील इतर महाविद्यालये करून घेतील. अशी व्यवस्था अधिक व्यावहारिक होईल. कला, वाणिज्य अथवा व्यवस्थापन विषयातील विद्यार्थ्यांना संशोधनासाठी सर्वेक्षण करण्याची आवश्यकता असते. त्याची प्राथमिक जुळणी करून देण्याचे काम एखाद्या विशिष्ट गटाकडे सोपविले, तर संशोधकांचे काम अधिक सोपे होईल. संशोधन हे समाजाला उपयुक्त ठरावे, यातून समाजातील काही ना काही समस्येवर उत्तर मिळावे ही अपेक्षा आहे. त्यामुळे संशोधनाचा दर्जा तपासणे, त्याची उपयुक्तता तपासणे, निकृष्ट दर्जाचे किंवा कोणाची तरी नक्कल करून केलेले संशोधन वेगळे काढता येण्यासाठी, तसेच उत्तम दर्जाचे संशोधन मान्यवर जर्नलमध्ये प्रसिद्धीसाठी पाठविणे, त्याचे पेटंट करून घेणे अशा प्रक्रिया करण्याकरता एक वेगळा कार्यगट निर्माण करावा लागेल. हा कार्यगटही त्याच्या संकुलातील केंद्रस्थानी असलेल्या महाविद्यालयाच्या मदतीनेच करावा लागेल. जगातील सर्व विकसित देशांच्या तुलनेत भारतात चाललेले संशोधन अत्यंत अपुरे, निकृष्ट दर्जाचे आहे अशी टीका वारंवार केली जाते. त्यात तथ्यही आहे. संशोधनास योग्य दिशा देणे व त्याचा देशाच्या विकासाला उपयोग करून देणे याची ही सुवर्णसंधी आहे व अभिमत विद्यापीठे किंवा ऑटोनॉमस कॉलेजेस ही सुवर्णसंधी उचलू शकतात.

हे धोरण खासगीकरणाला उत्तेजन देणारं आहे व एकप्रकारे अधिकाधिक प्रमाणात कॉलेजेसना स्वायत्तता (तीही आर्थि स्वायत्ततेसह) देण्याची या धोरणातली शिफारस पाहता विद्यार्थ्यांना शिक्षण - खास करून उच्चशिक्षण हे अधिक महाग व न परवडणारं होण्याची शक्यता आहे, ही वाटणारी भीती रास्त आहे. आजही उच्चशिक्षण ग्रामीण बहुजनास व शहरी गरिबास न परवडणारं आहे. त्यामुळे धोरणातील कॉलेजमध्ये ५० टक्क्यांपर्यंत ग्रॉस एन्रोलमेंट रेशो वाढवण्याचं उद्दिष्ट कागदावरच तर राहणार नाही ना, ही शंका वाटते. ती प्राप्त परिस्थितीत निराधार आहे, असं म्हणता येणार नाही. पुन्हा १०० सर्वोत्तम परकीय विद्यापीठांना भारतात येण्याची परवानगी द्यावी, ही शिफारस पण उच्चशिक्षण हे अधिक महाग करणारी आहे. त्यामुळे या क्षेत्रात धोरणातील अपेक्षित ध्येयधोरणं साध्य करायची असतील, तर शासनानं उच्च शिक्षणात गुंतवणूक अधिक वाढवणं, न की ती कमी करणं महत्त्वाचं आहे. नाही तर भारतातला आज स्थूलमानानं सधन असणाऱ्या पंचवीस टक्के वर्गाची

उच्चशिक्षणातली (आजही विद्यमान व ठळक जाणवणारी) मक्तेदारी अधिक वाढून नवा उच्चशिक्षणाचा ‘आहे रे’ आणि ‘नाही रे’ वर्ग (जो आजही विद्यमान आहे) तो अधिक वाढून त्यातली दरी अधिक रुंद होईल. या प्रश्नाचा प्रस्तुत धोरणात पुरेसा विचार झालेला नाही, असं म्हणणं भाग आहे.

नवीन शैक्षणिक धोरणाने शिक्षण संस्थांसमोर मोठी आव्हाने निर्माण केली आहेत, तशी नवनिर्मितीची संधीही उपलब्ध करून दिली आहे. देशाचा विकास हा त्याच्या शैक्षणिक विकासाशी सुसंगत असतो. आजवर शैक्षणिक विकासाकडे शासनाने लक्ष दिले नव्हते. त्यामुळे देशाचा विकासही योग्य प्रकारे झाला नव्हता. आता नवीन शैक्षणिक धोरणाच्या स्वरूपात शासनाने शैक्षणिक परिवर्तनाचे मोठे पाऊल उचलले आहे. त्यास सामाजिक व शैक्षणिक संस्थांनी तेवढ्याच ताकदीने प्रतिसाद दिला पाहिजे. हे केवळ शिक्षणाच्याच नव्हे, तर संपूर्ण देशाच्या परिवर्तनातील एक महत्त्वाचे पाऊल ठरेल.

## संदर्भ ग्रंथः-


1. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -2020 , शिक्षण मंत्रालय, भारत सरकार (मराठी आवृत्ती)
2. जनार्दन वाघमारे, ‘बदलते शिक्षणः स्वरुप आणि समस्या’ पद्यगंधा प्रकाशन, पुणे.
3. लक्ष्मीकांत देशमुख, ‘नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 : एक चिकित्सक अभ्यास’साधना प्रकाशन, 2022.
4. https://www.education.gov.in/sites/upload_files/mhrd/files/nep/Marathi1.pdf
5. https://www.aksharnama.com/client/granthnama_article_detail/5668
6. https://www.orfonline.org/marathi/five-challenges-that-would-shape-the-outcome-of-nep-2020-96761/
7. https://www.evivek.com/Encyc/2020/9/5/New-Education-Strategy-Implementation.amp.html
8. https://online.fliphtml5.com/mspem/xvby/#p=2